# शेतकरी आणि विक्रेत्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित

**पुणे** : भाज्या, फळे आणि डाळींच्या उपलब्धतेबद्दल व त्यांच्या किंमतीविषयी माहिती देणारा तसेच हा माल शेतातून ग्राहकांपर्यंत आणण्यासाठी लागणारा आर्थिक ताण कमी करणारा डिजिटल प्लॅटफॉर्म मायविश्व टेक्नोलॉजीने विकसित केला आहे.

फार्मर्सओआरजी डॉट इन नवाच्या या ऑनलाईन सेवेमुळे शेतकऱ्यांना किरकोळ, घाऊक विक्रेते तसेच मोठ्या संस्था, सोसायट्यांच्या गरजा समजतील व ते त्याप्रमाणे प्रतिसाद देतील. अॅन्ड्रॉईड व आयओएस अॅपच्या स्वरूपात उपलब्ध आहे, अशी माहिती कंपनीचे संचालक मंदार जोगळेकर यांनी दिली.

यामध्ये शेतकरी व विक्रेंत्यांना एक सोपा फॉर्म भरून तो साईटवर अपलोड करावा लागेल. यासाठी कोणताही आर्थिक व्यवहार किंवा डिलिव्हरी प्रक्रिया होणार नसल्याने ही ई-कॉमर्स साईट नाही. मराठी, हिंदीसह १० वेगवेगळ्या भाषांमध्ये ही सुविधा उपलब्ध असून, एकाच आठवड्यात १०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली असल्याचेही त्यांनी सांगितले.